ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १८ मार्च, १९६४ | अंक ६

## विविध माहिती

**वनस्पतींसाठी कांचेचीं घरें**—हिमालयांत सांपडणाऱ्या दुर्मीळ वनस्पतींचें रक्षण करण्याची एक योजना इंडिअन कौन्सिल फॉर ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेनें हातीं घेतली आहे. ह्या वनस्पतींचें संरक्षण करण्यासाठीं सिक्किम येथें तीन कांचेचीं घरें बांधण्यांत येत आहेत. त्यांपैकीं दोन घरें पूर्ण झालीं असून उरलेलें लवकरच तयार होईल. घरें बांधण्याचा खर्च अर्थातच भारत सरकार करीत आहे.

**ॲंड्र्यूज जातीच्या कापसाची लागवड**—नगर जिल्ह्यांतील श्रीरामपूर, कोपरगांव आणि संगमनेर भागांत गेल्या वर्षी ॲंड्र्यूज जातीच्या कापसाची प्रायोगिक लागवड महाराष्ट्र सरकारच्या शेतकी खात्यानें केली होती. कापसाचें दर एकरीं पीक आणि त्याला आलेली किंमत उत्तेजक वाटल्यामुळें चालू हंगामांत खात्यातर्फे १ हजार एकर जमिनींत ह्या जातीच्या कापसाची लागवड करण्यांत येणार आहे.

**शारीरिक श्रमांची प्रतिष्ठा**—पवई येथील तंत्र-विज्ञान-विषयक शिक्षण देणाऱ्या संस्थेंत पत्रकारांशीं बोलतांना रशिआचे माध्यमिक शिक्षणमंत्री म्हणाले कीं, शारीरिक श्रमांना बौद्धिक श्रमांच्या बरोबरीची प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी रशिआंत कसून प्रयत्न करण्यांत येत आहेत. रशिआंतील बहुतेक आधुनिक कारखान्यांतून स्वयंचलित यंत्रसामग्री बसविण्यांत आली आहे.

**६० लाख निर्वासित**—भारताच्या फाळणी झाल्यापासून पूर्व पाकिस्तानांतून ६० लाख हिंदी निर्वासित भारतांत आले आहेत. त्या वेळीं पूर्व पाकिस्तानांत १·२५ कोटी हिंदू होते. त्यांपैकीं ४० टक्के आतांपर्यंत भारतांत आले आहेत. पाकिस्तानच्या शिरगणतीनेंहि हा अंदाज खरा ठरतो.

**तयार चहाचा कारखाना**—केरळमध्यें टाटा-फिन्ले कंपन्यांनीं सहकार्य करून तयार चहा बनविणारा कारखाना स्थापन केला आहे. कारखान्यांत पुढील वर्षी उत्पादनाला प्रारंभ करण्यांत येईल. कारखान्याची यंत्रसामग्री अत्याधुनिक असून त्यात दरसाल १ कोटी पौंड तयार चहा निर्माण करण्यांत येईल. कारखान्यांचा विस्तार करण्याची सोय ठेवण्यांत आली आहे.

**मदुरा येथें नवें शेतकी कॉलेज**—मद्रास सरकार मदुरा येथें नवें शेतकी कॉलेज स्थापन करणार आहे. तें १९६५ च्या जुलै महिन्यापासून सुरू होईल. कॉलेजच्या स्थापनेसाठी लागणाऱ्या जागेपैकीं १०० एकर जागा सरकारच्या मालकीची आहेच. परंतु तेवढ्यानें भागण्यासारखें नसल्यानें आणखी २०० एकर जवळपासची जमीन सरकार ताब्यांत घेणार आहे.

**हौशी प्रवाशांच्या सोयीसाठीं**—हौशी प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्र सरकार आणि खाजगी संघटना ह्यांनीं सहकार्यानें प्रयत्न केले पाहिजेत असा विचार राज्याच्या प्रवासी खात्याच्या मंत्र्यांनीं बोलून दाखविला. मुंबई येथें नरिमन पॉईंट ह्या ठिकाणीं प्रवाशांची सोय करण्यासाठीं ७०० खोल्या असलेली एक भव्य इमारत बांधण्यांत येणार असल्याची माहिती त्यांनीं दिली आहे.

**ताशीं १७० मैल वेगाच्या आगगाड्या**—रशियांतील आगगाड्या थोड्याच वर्षांत ताशीं १७० मैल वेगानें जाऊं लागतील आणि त्यामुळें वैमानिक वहातुकीला आगगाड्यांची स्पर्धा होऊं लागेल, असें रशियाच्या रेल्वे खात्याच्या उपमंत्र्यांनीं सांगितलें आहे.

**४०% भिकारी धडधाकट**—बेगर्स ॲक्ट पुणें शहराला १५ फेब्रुवारी रोजीं लागू करण्यांत आला, तेव्हांपासून एकूण ४८ भिकाऱ्यांना अटक करण्यांत आली. त्यांपैकीं १७ भिकारी धडधाकट होते, ६ पंगू होते, १६ वृद्ध होते आणि ४ वेडसर होते.

**केंद्रीय सहकारी बँकेच्या मॅ. डायरेक्टराला शिक्षा**—ओरिसा स्टेट सें. को. बँकेचे भूतपूर्व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एच. सी. बोस, ह्यांना बँकेंत २·५ लक्ष रुपयांची अफरातफर केल्याबद्दल कटकच्या मॅजिस्ट्रेटनें १२ वर्षें सक्तमजुरीची शिक्षा दिली. पांच वर्षें बोस फरारी होते; त्यांची माहिती देणाराला ५,००० रुपयांचें बक्षीस पोलिसांनीं जाहीर केलें होतें.

**नेवेली विद्युत् केंद्रासाठी मदत**—नेवेली येथील औष्णिक विद्युत् निर्मिति केंद्राचा विस्तार करण्यासाठी रशिआकडून आणखी मदत घेण्यांत येणार आहे. ह्या संबंधींचा करार नुकताच करण्यांत आला. केंद्राचा विस्तार करण्यासाठी यंत्रसामग्री व इतर साधनें मिळून ७·७५ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. विस्ताराचें कार्य पूर्ण झाल्यावर केंद्रांत २५० मेगॅवॅट ऐवजीं ४०० मेगॅवॅट वीज उत्पन्न करतां येईल. नवीन यंत्रसामग्री उभारण्याचें काम रशिअन तंत्रज्ञच करणार आहेत. तिची किंमत रशिआनें दिलेल्या कर्जांतून देण्यांत येईल.

**विमानें उतरण्यांतील धोका नष्ट**—विमानांचे बहुतेक अपघात विमान चढतांना अगर उतरतांना होतात. विमानतळावरील हवामान ढगाळ असेल तर अपघाताचा संभव अधिकच वाढतो. विमानतळावरील ढगांची गर्दी पांगविण्याची एक युक्ति रशिअन शास्त्रज्ञांनीं शोधून काढली आहे. शास्त्रज्ञांनीं तयार केलेल्या एका तोफेंतून ढगांवर कोरड्या बर्फाचा मारा करण्यांत येतो. त्यामुळें ढग पांगून वैमानिकाचा मार्ग स्पष्ट होतो.

### कामसूत्रावर पोलिसांची धाड

मँचेस्टर येथील पोलिसांनीं बीभत्स वाङ्मयाच्या आरोपाखाली पुस्तकांच्या दुकानांतील तीन पुस्तकांच्या प्रती जप्त केल्या आहेत. त्यांपैकी एक कामसूत्र हें पुस्तक आहे. आतांपर्यंत हें पुस्तक ब्रिटनमधील कोणत्याहि भागांत सहज मिळत असे. २१० वर्षांपूर्वी लिहिण्यांत आलेल्या फॅनीहिल नामक कादंबरीच्या प्रती जाळण्यांत याव्या असा आदेश लंडनमधील एका कोर्टानें दिला आहे. ह्याहि पुस्तकाविरुद्ध बीभत्सतेचा आरोप आहे. पुस्तकांत वेश्यांच्या जीवनाचें चित्रण केलेलें आहे.

---

### आंध्र पेपर मिल्सचें भवितव्य

राजमहेंद्री येथील सरकारी मालकीची आंध्र पेपर मिल्स ही गिरणी खाजगी कारखानदाराला विकण्याचा विचार आंध्र सरकारनें चालविला होता. ह्या गिरणीच्या विस्तारासाठी व आधुनिकीकरणासाठी ५ कोटी रुपये खर्च करणें आवश्यक होतें. गिरणी विकून ही रक्कम इतर तांतडीच्या कामासाठी वापरण्याचा सरकारचा इरादा होता. परंतु कोणीतरी हें प्रकरण पं. नेहरूंच्या ध्यानीं आणलें. त्यांनीं तें नियोजन समितीकडे सोंपविलें. नियोजन समितीनें आतां असें सुचविलें आहे कीं, कागदाचा धंदा महत्त्वाचा असल्यानें गिरणीची विक्री न करतां सरकारनेंच एक लिमिटेड कंपनी काढून ती चालवावी : मात्र ह्या नव्या कंपनींत सरकारी भांडवलाचें प्रमाण भरपूर असलें पाहिजे.



---

### कांदे–बटाटे वाटसरूंना मोफत वांटले

उत्तर इटलीमधील कांदे व बटाटे पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना ७० टन कांदे–बटाटे उत्तर इटलींतील हमरस्त्यांवरून जाणाऱ्या मोटारींतील वाटसरूंना फुकट वांटून टाकले. उत्तर इटलींतील हमरस्त्यांच्या चौकांत आणि जकात नाक्यांत शेतकऱ्यांच्या सौंदर्यसंपन्न तरुणी उभ्या राहिल्या व त्यांनीं जाणाऱ्या-येणाऱ्या मोटारवाहकांत कांदे–बटाट्यांचीं ७०,००० पोतीं वांटलीं. पुष्कळ परदेशी प्रवाशी मालाची किंमत देऊं लागले; पण ती नाकारण्यांत आली. युरोपियन कॉमन मार्केटमध्यें सामील झालेल्या जर्मनी, फ्रान्स व हॉलंड ह्या देशांतून इटलींत आलेल्या बटाट्यांची स्पर्धा इटलीमधील शेतकऱ्यांना जाचक होऊं लागली आहे. स्पर्धेचे परिणाम जाहीर करण्यासाठी त्यांनीं हा मार्ग अनुसरला.


दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] सुभाट, मुंबई–४. [ टेलिफोन ७२१००
बचतीच्या आकर्षक योजना
( १ ) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर ३॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत — ” ३। ”
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — ” ५ ”
मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
“ विजय ” नांगर

वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग
तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१” ते ४” बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

सरदारगृह
मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमचीं वैशिष्ट्यें —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म–शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.
फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# अर्थ

बुधवार, १८ मार्च, १९६४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कापड गिरण्यांच्या यंत्रसामग्रीची आयात

कापडाच्या गिरण्यांना लागणारी १० कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्रीची आयात करण्याचें भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन निश्चित केलें आहे. प्लॅट ब्रदर्स ह्या प्रसिद्ध ब्रिटिश कंपनीकडून ती आयात करण्यांत येणार असून भारतामधील १७ कापड गिरण्यांना ती देण्यांत येईल. ह्यांपैकीं १० गिरण्या सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या आहेत. प्लॅट ब्रदर्स ही कंपनी गेलीं १०० वर्षें भारताला कापड-गिरण्यांची यंत्रसामग्री पुरवीत आहे. यंत्रसामग्रीसाठीं लागणारें परदेशीय चलन ब्रिटिश सरकारनें देऊं केलेल्या कर्जाच्या बाहेरील आहे. यंत्रसामग्री पुरविणाऱ्या कंपनीनेंच मिडलंड बँकेमार्फत जरूर तें परदेशीय चलन कर्जाऊ मिळण्याची व्यवस्था केली आहे. परदेशीय बाजारपेठांत मागणी असलेल्या उच्च प्रतीच्या कापडाचें व सुताचें उत्पादन करणाऱ्या गिरण्यांनाच यंत्रसामग्री देण्यांत येणार आहे. देशांत तयार होणारी कोणतीहि यंत्रसामग्री परदेशांतून आयात करावयाची नाहीं, असें सरकारचें धोरण असतांहि ही आयात कां करण्यांत येत आहे, असा प्रश्न उत्पन्न होतो. कापडाची निर्यात चालू ठेवतां यावी म्हणून नव्या यंत्रसामग्रीची भारताला फार गरज आहे. परंतु ही गरज देशांतील यंत्रसामग्रीचे कारखाने आणखी २० महिने तरीं भागवूं शकत नाहींत. कापडगिरण्यांना लागणारी यंत्रसामग्री तयार करण्यासाठीं अजूनहि कांहीं परदेशीय भाग वापरावे लागतात. त्यांच्या आयातीची सोय करूनहि विशिष्ट प्रकारची यंत्रसामग्री भारतांत करतां येत नाहीं. अशा परिस्थितींत जरूर त्या यंत्रांची आयात करण्याशिवाय भागण्यासारखें नाहीं.

## पशुधनाची चांगली निगा राखण्याची जरुरी

नागपूर येथें गुरांचें २१ वें अखिल भारतीय प्रदर्शन आणि कोंबड्या पाळण्याच्या धंद्याचें १८ वें अखिल भारतीय प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शन एक आठवडाभर चालविण्यांत आलें होतें व त्यांत ५०० नमुनेदार गुरें पाठविण्यांत आलीं होतीं. प्रदर्शनाच्या निमित्तानें महाराष्ट्र सरकारच्या पशुवैद्यक खात्यानें एक पुस्तिका काढली आहे. पुस्तिकेंत १०० वर्षांपूर्वी नागपूरच्या कलेक्टरनें कलकत्ता येथील गुरांच्या प्रदर्शनांत मिळविलेल्या पदकाची माहिती देण्यांत आली आहे. प्रदर्शनाचें उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्य मंत्री, श्री. नाईक ह्यांनीं केलें. ह्या प्रसंगीं केलेल्या भाषणांत ते म्हणाले कीं, पशुधनाची निगा राखण्याकडे आणि त्याचा अधिक चांगला उपयोग करण्याकडे सध्यांपेक्षा अधिक लक्ष देण्याची अतिशय आवश्यकता आहे. पशुधनाचें महत्त्व उघडच आहे. ह्या धनाला देशाच्या अर्थव्यवस्थेंत बरेंच वरचें स्थान आहे. गुराढोरांच्या वापरामुळें महाराष्ट्राला दरसाल ३२६ कोटी रुपयांचें उत्पन्न होतें ही एकच गोष्ट पशुधनाच्या महत्त्वाची पुरेशी द्योतक आहे. हिंदु धर्मांत गाईला महत्त्वाचें स्थान दिलेलें आहे. देशांत गुरांचीं खिल्लारेंहि भरपूर आहेत. इतकें असूनहि भारतांत दुधाचें उत्पादन आणि त्याचा खप इतर आधुनिक देशांच्या मानानें फारच कमी आहे. पशुधनाची अधिक चांगली निगा राखण्यासाठीं आणि त्याचा अधिक चांगला उपयोग करून घेण्यासाठीं राज्यसरकार उत्तेजन देत आहे. ह्या उत्तेजनाचा फायदा घेऊन अधिक लोक गुरांच्या जोपासनेकडे लक्ष वळवितील तर बरें होईल. त्यामुळें त्यांची तर भरभराट होईलच; परंतु देशाची अर्थव्यवस्था बळकट होण्यासाठीं मदत होईल.

## शहरांतील तरुण अविवाहितांची मनोव्यथा

मद्रासमधील सरकारी आर्ट्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं भारत सरकारच्या पुरस्कारानें शहरांतील अविवाहित व नोकरी करणाऱ्या तरुणांच्या जीवनक्रमाची नमुना पहाणी केली आहे. ह्या पाहणींत अशा ४०० तरुणांना एक प्रश्नपत्रिका पाठविण्यांत आली होती. त्यांनीं दिलेल्या उत्तरावरून मोठ्या शहरांत राहणाऱ्या ब्रह्मचारी तरुणांच्या कुचंबणेवर उद्बोधक प्रकाश पडतो. पाहणींत असें आढळून आलें कीं मद्रास शहरांतील निवासस्थानांत राहणाऱ्या ह्या तरुणांपैकी ९० टक्के तरुण अतिशय कुचंबणा करणाऱ्या परिस्थितींत जीवन कंठीत आहेत. त्यांच्यामध्यें कसलाहि उत्साह अगर पुढाकार घेण्याची वृत्ति दिसून येत नाहीं. त्यांचें सरासरी वय २५ वर्षांचें आहे आणि त्यांना शक्य तर नोकरी असणारी सुशिक्षित पत्नी हवी आहे. तथापि १७ टक्के तरुणांना अशी पत्नी नको आहे. ५० टक्के तरुणांनीं राहणीचा दर्जा निकृष्ट असल्यामुळें विवाह लांबणीवर टाकलेला दिसून आला तर २५ टक्के तरुण घरची परिस्थिति, जात, इत्यादि कारणांमुळें अविवाहित राहिलेले होते. त्यांच्या आर्थिक व्यवहाराकडे पाहतां असें दिसून आलें कीं मिळणाऱ्या वेतनापैकी १५ टक्के भाड्यासाठीं, ४० टक्के अन्नासाठीं, ७ टक्के कपड्यांसाठीं आणि फक्त ३ टक्के मनोरंजनासाठीं खर्च होत होते. १२ टक्के रकमेची बचत करण्यांत येत होती आणि ६ टक्के रक्कम वाहतूक, बिडीकाडी, धोबी, वृत्तपत्रें, प्रसाधनें, इत्यादि बाबींवर खर्च करण्यांत येत होती. गेल्या कांहीं वर्षांत त्यांचें पैशांतील उत्पन्न ५ टक्क्यांनीं वाढलेलें असलें तरी खरें उपभोग्य उत्पन्न सरासरी १५ टक्क्यांनीं कमी झालेलें दिसून आलें.

## भारत–युगोस्लाव्हिआ औद्योगिक सहकार्य

भारत आणि युगोस्लाव्हिआ ह्यांनीं एकमेकांशीं औद्योगिक सहकार्य करण्याचें ठरविलें आहे. युगोस्लाव्हिआच्या सहकार्यानें भारतानें अनेक प्रकारचे उद्योगधंदे उभारावे आणि त्यांतून तयार होणारा माल युगोस्लाव्हिआला निर्यात करावा, असें ठरविण्यांत आलें आहे. युगोस्लाव्हिआ भारताला यांत्रिक हत्यारें, अल्युमिनि, अम्‌ रसायनें आणि बोटी बांधणें ह्या उद्योगधंद्यांबाबत सहकार्य देऊं शकेल. उभयतां देशांत अशा प्रकारचें सहकार्य झाल्यानें उत्पादनाच्या कामीं चांगला श्रमविभाग करतां येईल आणि उत्पादनाच्या खर्चांत बचतहि करतां येईल अशी अपेक्षा आहे. भारताच्या दृष्टीनें आगबोटी बांधणीच्या धंद्यांत युगोस्लाव्हिआकडून मिळणारी मदत विशेष महत्त्वाची मानण्यांत येत आहे.

## चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मर्यादित पैसा

हिंदमधील लोकांचें जीवनमान सुधारण्यासाठी पंचवार्षिक कार्यक्रमांचा स्वीकार करण्यांत आला. देशाचा आर्थिक विकास घडवून आणून कांहीं विशिष्ट सामाजिक ध्येयें गांठण्यासाठी हे कार्यक्रम आंखण्यांत आले. परंतु, पैशाच्या अभावीं हीं ध्येयें गांठणें नजीकच्या भविष्यकालांत तरी शक्य होणार नाहीं, अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. चालू दशक संपण्यापूर्वी प्रत्येक माणसाचें दरडोई मासिक उत्पन्न निदान २० रुपये असावें असें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. परंतु, आतां हें उद्दिष्ट गांठण्यासाठी पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या समाप्तीची वाट पहावी लागणार असें दिसत आहे. खुद्द चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचीं सामाजिक उद्दिष्टेंच फारशी भव्य असूं शकणार नाहींत. ह्या कार्यक्रमांत आत्यंतिक दारिद्र्य आणि सामाजिकदृष्ट्या चैन ठरणारी उधळपट्टी ह्यांना आळा घालण्याचेच प्रयत्न मुख्यतः करण्यांत येतील. त्या दृष्टीनें फार मोठ्या उत्पन्नांत काटछाट करणें आणि अतीव दारिद्र्य नष्ट करणें हें ध्येय सरकार स्वतः पुढें ठेवण्याचा संभव आहे. सगळ्यांत कमी उत्पन्न आणि सगळ्यांत अधिक उत्पन्न ह्यांच्यांतील प्रमाण १:२० ह्यापेक्षा अधिक नसावें असें ठरविण्यांत आलें आहे. परंतु, तें प्रत्यक्षांत उतरविण्यासाठीं पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाची वाट पहावी लागणार आहे. ह्याचें कारण अपुरा पैसा हें आहे. चौथा कार्यक्रम अमलांत आणण्यासाठीं २० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक पैसा उपलब्ध होईल अशी शक्यता दिसत नाहीं. एवढ्या पैशांत, ठरविलेलीं सामाजिक ध्येयें गांठणें अशक्य आहे.

## उत्पन्नाची विषम वाटणी गेली पाहिजे

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेपुढें बोलतांना नियोजन समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता म्हणाले कीं, आर्थिक विकास घडवून आणण्याचें काम चालू असतांनाच उत्पन्नाच्या वांटणीच्या सध्यांच्या व्यवस्थेंत बदल घडवून आणले पाहिजेत. विकास साधण्याचे प्रयत्न आणि उत्पादित धनाची अधिक चांगली वांटणी ह्यांच्यांत विरोध असतां कामा नये. भारतामधील सध्यांच्या उत्पन्नाच्या वांटणींत बदल केल्यानेंच केवळ देशाची आर्थिक दुखणीं बरीं होतील असें नाहीं. त्यासाठी उत्पादनवाढीचा वेग वाढविणें हाच एक उपाय आहे. तथापि, उत्पन्नाच्या निराळ्या पद्धतीच्या वांटणीमुळें दारिद्र्यविषयक परिस्थितींत फारसा फरक पडणार नाहीं, हें खरें असलें तरी तेवढ्यामुळें अशा पद्धतीची जरूरच नाहीं असें म्हणणें योग्य होणार नाहीं. म्हणून उद्योगपतींनीं समाजवादी हेतूच्या आकर्षकतेबद्दल तुच्छतेची भावना मनांत बाळगूं नये. त्यांनीं बदलत जाणाऱ्या प्रवाहाशीं जमवून घेतलें पाहिजे. कारण, देश जितका अविकसित तितकी तेथील धनाची वांटणी विषम झालेली दिसते. अशा परिस्थितींत साम्यवादाचें आकर्षण अधिकाधिक होत जाणें अपरिहार्यच आहे. भारताला विकास आणि संरक्षण हीं दोन्हीं एकाच वेळीं साधावयाचीं आहेत. तेव्हां उपभोगावर नियंत्रणें घालणें टाळतां येण्यासारखें नाहीं. भारतासारख्या अप्रगत देशांत अशीं नियंत्रणें समाजांतील अल्पसंख्य संपन्न वर्गावरच अनिवार्यपणें येणार. कारण, समाजाच्या खालच्या थरांतील लोकांपेक्षा त्यांची मिळकत खूपच अधिक असते.

**पोलंडमधील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन**—पोलंडमध्यें जूनमध्यें भरविण्यांत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारप्रदर्शनांत भारत भाग घेणार आहे. युरोपांत भरविण्यांत येणारें हें एक महत्त्वाचें प्रदर्शन असून तेथें अनेक देशांना एकमेकांशी व्यापारी सौदे करण्याची संधि मिळते.

## सोन्याच्या संयुक्त सांठ्याबाबत बँकांचें सहकार्य

बँक ऑफ इंग्लंडनें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आपल्या तिमाही अहवालांत सोन्याचा संयुक्त सांठा करण्याच्या कामीं बँकांनीं केलेल्या सहकार्याची माहिती देण्यांत आली आहे. सोन्याच्या बाजारांत तेजी-मंदी खेळणारांच्या व्यवहारानें जे चढउतार होतात ते मर्यादेबाहेर जाऊं न देण्याच्या कामीं ह्या सहकार्याचा चांगला उपयोग झालेला आहे. ह्या कामीं अमेरिका आणि युरोपांतील कांहीं मध्यवर्ती बँका ह्यांनीं बँक ऑफ इंग्लंडला साथ दिली. लंडनच्या बाजारांत सोन्याच्या खरेदीच्या बाबतींत ह्या बँकांनीं सुसंगत धोरण ठेवलें होतें. परिणामीं सोन्याच्या संयुक्त सांठ्यांत आज ६० कोटी डॉलर्स अथवा २१·५ कोटी पौंड किमतीचें सोनें असून तें वरील बँकांत विभागलें गेलेलें आहे. खुल्या बाजारांतील सोन्याच्या किमतींत जे अनावश्यक व वेडेवाकडे बदल होतात ते टाळण्यासाठीं सोन्याच्या संयुक्त सांठ्याची कल्पना निघालेली आहे. सोन्याच्या किमतींत मर्यादेबाहेर आंदोलनें झाल्यास त्याचा परिणाम परदेशीय चलनांच्या स्थैर्यावरहि झाल्याशिवाय राहात नाहीं. सोन्याच्या संयुक्त सांठ्यांत भाग घेणाऱ्या बँकांनीं गेल्या वर्षी बाजारांत सोन्याच्या खरेदीचे व विक्रीचे व्यवहार केले. ह्या व्यवहारांमुळें बँकांचा फायदाच झाला असून त्यांच्या सुवर्णसंचयांत बरीच भर पडलेली आहे. संयुक्त सांठ्याच्या अभावीं बँकांजवळील सुवर्णसंचय कमी झाला असता किंवा काय तें अजमावतां येण्यासारखें नाहीं. परंतु सोन्याच्या व परदेशीय चलनाच्या बाजारांत बँका परस्पर सहकार्यानें वागत आहेत हें कळल्यामुळें आंतरराष्ट्रीय नाणेबाजारांत विश्वास निर्माण झाला.

## हट्टी सोन्याच्या खाणीसाठी नवी यंत्रसामग्री

म्हैसूर राज्यांतील हट्टी ह्या ठिकाणच्या सोन्याच्या खाणींत नवीन यंत्रसामग्री बसविण्यांत यावयाची आहे. दररोज १,००० टन सुवर्णमिश्रित दगडांचें चूर्ण करूं शकणाऱ्या ह्या संकल्पित यंत्रसामग्रीसाठी सुमारें १२ कोटी रुपये खर्च येईल. यंत्रसामग्रीचे सर्वच भाग भारतांत तयार होण्यासारखे नाहींत. त्यामुळें जनरल इलेक्ट्रिक ह्या ब्रिटिश कारखान्यामार्फत कांहीं भाग तयार करून घेण्यांत येणार आहेत. त्याबद्दल जरूर तो करारहि ब्रिटिश कारखान्याशीं करण्यांत आला आहे. उरलेली यंत्रसामग्री मात्र भारतांतच बनविण्यांत येणार आहे. नवीन यंत्रसामग्री तयार होऊन ती खाणींत बसविण्याच्या कामास दोन-अडीच वर्षांचा काळ लागेल असा अंदाज आहे.

## बोकॅरो पोलाद कारखान्याला जपानची मदत !

बोकॅरो येथें काढण्यांत यावयाच्या चौथ्या पोलाद कारखान्यासाठीं जपानकडून मदत मिळण्याची शक्यता आहे. जपानमधील पोलाद कारखानदारांची मदत करण्याची इच्छा आहे. परंतु पोलाद कारखान्यांसाठीं लागणारा सर्वच पैसा हे कारखानदार कर्जाच्या रूपानें उभारूं शकत नाहींत. त्यासाठी जपानच्या सरकारच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. जपानच्या सरकारच्या अर्थखात्याला पं. नेहरूंच्या आजारापासून भारतामधील राजकीय स्थैर्याची खात्री वाटत नाहीं. त्यामुळें सरकारी पाठिंबा शंकास्पद आहे. ही व इतर अडचणी दूर झाल्या तरी जपानकडून अधिकांत अधिक १० कोटी डॉलर्स म्हणजे परदेशीय चलनांतील खर्चापैकी निम्मा खर्चच मिळेल.

## बोनसवर जप्ति आणतां येते काय ?

केहरसिंग या इसमानें पुरनसिंगाविरुद्ध १९५७ सालीं ३१७ रुपयांची डिक्री मिळविली. पुरनसिंग दिल्ली क्लॉथ अँड जनरल मिल्स कंपनींत मजूर होता. कराराप्रमाणें त्याला मालकाकडून बोनस मिळाला.

केहरसिंगनें आपल्या डिक्रीच्या अंमलबजावणींत त्या बोनसवर जप्ति आणली. पुरनसिंगनें त्या जप्तीला विरोध केला. बोनसवर जप्ति आणतां येत नाहीं, कारण सिव्हिल प्रोसिजर कोड, क. ६० (१)(एच्)खालीं मजूर आणि घरगुती नोकर यांना मिळणारी मजुरी जप्तीपासून मुक्त केली आहे, असें पुरनसिंगचें म्हणणें होतें.

अंमलबजावणी कोर्टानें हें म्हणणें मान्य करून पुरनसिंगला मिळालेल्या बोनसावर जप्ति आणतां येत नाहीं असा निकाल दिला. या निकालाविरुद्ध केहरसिंगनें हायकोर्टांत रिव्हिजन-अर्ज केला.

बोनस हा मजुरीचा भाग आहे काय या प्रश्नावर मद्रास आणि सौराष्ट्र हायकोर्टांत दुमत असल्यामुळें पंजाब हायकोर्टाच्या न्यायमूर्तींनें तो प्रश्न हायकोर्टाच्या डिव्हिजन बेंचपुढें ठेवला.

मद्रास आणि सौराष्ट्र हायकोर्टांत या प्रश्नावर असलेलें दुमत वास्तविक पाहतां दुमत नाहीं असें डिव्हिजन बेंचला आढळून आलें. मद्रास हायकोर्टापुढील मामल्यांत कामगाराला मिळालेलें बोनस एक्स ग्रॅशिया होतें. त्या निवाड्यांतहि या तत्त्वाला मान्यता देण्यांत आली होती कीं, कायद्याप्रमाणें अथवा कराराप्रमाणें देण्यांत आलेला बोनस मजुरीचा भाग बनतो.

सौराष्ट्र हायकोर्टाच्या निवाड्यांत असें म्हटलें आहे कीं, कापडगिरणींतील मजुरांना वेळोवेळीं मिळणारा बोनस सिव्हिल प्रोसिजर कोडच्या क. ६० (१) (एच्.) खालीं मजुरीचा भाग समजला जातो.

सद्यःपरिस्थितींत बोनस मजुरीचा भाग नाहीं असें म्हणतां येणार नाहीं; कारण नफ्याकरितां उद्योग करणाऱ्या मालकाला कामगार बोनस मागतात आणि मालकानें जर ती मागणी नाकारली तर प्रकरण इंडस्ट्रिअल कोर्टाकडे जातें आणि फॉर्म्युलाप्रमाणें बोनस देण्याचा हुकूम देते. इंडस्ट्रिअल कोर्टाच्या या अॅवॉर्डखालीं मिळणारा बोनस पगाराचा भाग समजला जातो आणि डिक्रीच्या अंमलबजावणींत त्या बोनसवर जप्ति आणतां येत नाहीं असा निकाल म्हैसूर हायकोर्टानें दिला आहे.

तिरुजी सिताराम वि. बदलूप्रसाद भूरुप्रसाद (ए. आय. आर. १९६२ मध्यप्रदेश ३६१) या मध्यप्रदेश हायकोर्टाच्या निवाड्यांत म्हटलें आहे कीं, नोकरी संपल्यानंतर नोकराला मिळणारी ग्रॅच्युइटी त्याच्या पगाराचा भाग समजली जाते.

कामगारांच्या मजुरीच्या कायद्यामध्यें मजुरी या शब्दाच्या व्याख्येंत कराराखालीं दिलेल्या बोनसचा समावेश केला आहे. मालक आणि नोकर यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें जर नोकरांना बोनस मिळत असेल तर तो पगाराचा भाग समजला जातो.

प्रस्तुत मामल्यांत दिल्ली क्लॉथ अँड जनरल मिल्स कंपनी आणि तिचे कामगार यांच्यांत १९५६ सालीं बोनस देण्याचा करार झाला होता आणि तो करार अजूनहि अस्तित्वांत होता. अशा परिस्थितींत त्या कराराप्रमाणें नोकरांना मिळणारा बोनस त्यांच्या पगाराचा भाग समजला पाहिजे आणि म्हणून पुरनसिंगविरुद्ध असलेल्या डिक्रीच्या अंमलबजावणींत त्या बोनसवर जप्ति आणतां येणार नाहीं असा निकाल हायकोर्टानें दिला आणि केहरसिंगचा रिव्हिजन-अर्ज नामंजूर केला. —न्यायबोध


पाहिलात फरक ?

मुलांचे आटून तोकडे झालेले कपडे, चुरगळलेल्या साड्या, सुरकुतलेले शर्ट व विजारी, असले गबाळेपणाचे दिवस आता गेले. आता सगळीजणच कशी रुबाबदार राहतात; कारण, सर्वजण नेहमी वापरतात —

ठाकरसी फॅब्रिक्स

— फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती

या कापडावर असे लेबल असते SANFORIZED



ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स

धी हिंदुस्तान स्पिनिंग अँण्ड वीव्हिंग मिल्स कं. लि.
धी क्राऊन स्पिनिंग अँण्ड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.
धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९.९९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १४.०४ ,, |
| ठेवी | रु. | ३९२.९९ ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ४३४.०० ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

### वाघहि ममतेनें शिकतो

हिंदमध्यें नुकत्याच येऊन गेलेल्या रशिअन सर्कसमधील हिंस्र पशूंचीं कामें घेणारे मि. अॅलेक्झांडर ह्यांनीं पशूंना शिकविण्याच्या तंत्राबद्दल आपला अनुभव सांगितला आहे. ते म्हणतात कीं हिंस्र पशूंना प्रेमानें आणि गोड शब्द बोलून आणि मांसाचें आमीष दाखवूनच शिकवावें लागतें. केवळ चाबकाच्या धाकानें ते शिकत नाहींत. त्यांच्या मनोव्यापाराची शिकविणाऱ्याला चांगली कल्पना असली पाहिजे. प्रथम गोड बोलून त्यांना आवाजाचा परिचय करून द्यावा लागतो. नंतर हळूहळू हुकूमवजा सूचना कराव्या लागतात आणि तरीसुद्धां त्यांचें शिक्षण हें काळावधीचें व चिकाटीचें काम आहे. वाघासारख्या हिंस्र जंगली जनावरांना काम शिकवितां येतें; पण त्यांना पूर्णपणें माणसाळवतां मात्र कधींहि येत नाहीं. निर्वैर वृत्तीनें आणि प्रेमानें वाघासारख्या क्रूर प्राण्यांवरहि सत्ता गाजविणाऱ्या भारतीय योग्यांच्या दंतकथा प्रचलित आहेत; त्यांत कांहीं तरी तथ्य असलें पाहिजे.

---

### बोकॅरो कारखान्यासाठी भांडवल उभारणी

बोकॅरो स्टील लि. ह्या सरकारी मालकीच्या कंपनीला आणखी १० कोटी रुपयांचें भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली आहे. भांडवल उभारणी नियंत्रक अधिकाऱ्याकडून घेण्यांत आलेली परवानगी फक्त १ वर्षाच्या मुदतीची आहे. ह्या मंजुरीला अनुसरून कंपनी १ हजार रुपये दर्शनी किंमतीचे १ लाख साधारण भाग विक्रीस काढणार आहे. प्रत्येक भागाची रोखीची किंमत दर्शनी किंमतीइतकीच राहणार आहे. बोकॅरो येथें उभारण्यांत यावयाच्या ४ थ्या पोलादाच्या कारखान्यासाठी ह्या भांडवलाचा उपयोग करण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी लागणारी जागा मिळविण्याचें काम चालू असून १९६४–६५ मध्यें जरूर असणाऱ्या जमिनीपैकी बरीच जमीन सरकारच्या मालकीची होईल अशी अपेक्षा आहे.

---

### व्यवसायकर घटनाबाह्य

मद्रास कॉर्पोरेशननें श्री. राजगोपालाचारी ह्यांना भारताचे माजी गव्हर्नर जनरल ह्या नात्यानें मिळणाऱ्या सालीना १५ हजार रुपये निवृत्तीचे वेतनावर व्यवसायकराची आकारणी १९५८–१९५९ सालासाठी केली होती. ही आकारणी घटनाबाह्य आहे. ह्या मुद्द्यावर श्री. राजगोपालाचारी ह्यांनीं मद्रास हायकोर्टाकडे ती रद्द करण्याबद्दल अर्ज केला होता. परंतु हायकोर्टानें तो फेटाळून लावला होता. त्यावर त्यांनीं सुप्रीम कोर्टाकडे अपील दाखल केलें होतें. त्याचा निकाल लागून असा कर बसविण्याचा हक्क मद्रास कॉर्पोरेशनला नाहीं असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानें दिला आहे.

---

### चीनचीं रुमेनिआशीं बोलणीं

चीनच्या सरकारशीं बोलणीं करण्याकरतां रुमेनिअन कम्युनिस्ट पक्षाचें एक मंडळ पेकिंगला गेलें आहे. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळींत अलीकडे घडलेली ही एक महत्त्वाची घटना मानण्यांत येत आहे. चीन व रशिआ ह्यांचे मतभेद उघड झाल्यावर रशिआनें पूर्व-युरोपांतील कम्युनिस्ट देशांना आपल्या बाजूचे ठेवण्यांत आतांपर्यंत यश मिळविलेलें आहे. उलटपक्षीं चीन कम्युनिस्ट देशांची सहानुभूति आपल्याकडे वळविण्याच्या खटपटींत आहे. चीन व रुमेनिआ ह्यांच्यांत कोणत्या विषयावर बोलणीं झालीं हें कळण्यास मार्ग नाहीं. तरीपण रशिआ व चीन ह्यांच्यामधील तात्त्विक मतभेदांबद्दल चर्चा करणें उभयतां देशांना टाळतां येण्यासारखें नव्हतें.


रु. १००–०० तुम्हीं आज गुंतवले, तर
तीन वर्षांअखेर त्याचे
रु. ११३–५० तुम्हांला मिळतील
दि बेळगांव बँक कॅश-सर्टिफिकेटांत
पैसे गुंतवा
आणि
द. सा. ४½% व्याज ठेव परत घेतांना मिळवा.
( जरूर पडली, तर मुदतीपूर्वी तुम्हीं रक्कम परत घेऊं शकतां; तुमच्या ठेवीची संपूर्ण रक्कम मिळून वर कांहीं व्याजहि पण मिळेल. )
[ सर्टिफिकिटें वेगवेगळ्या रकमेचीं दिलीं जातात. ]
आमच्या कोणत्याहि कचेरींत चौकशी करा
दि बेळगांव बँक लिमिटेड
स्थापना—१९३० ] [ शेड्यूल्ड बँक
— रजिस्टर्ड ऑफिस —
रविवार पेठ, बेळगांव.
म्हैसूर आणि महाराष्ट्र राज्यांत
शाखा विस्तार



दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा
शेड्यूल्ड बँक
हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.
टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:–युवर बँक
—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—
सेव्हिंग्ज् बँक:–३ टक्के
मुदत ठेवी
१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षे–४½ टक्के, ३ वर्षे–४¾ टक्के,
४ वर्षे–५ टक्के, ५ वर्षे–५¼ टक्के.
एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.
शाखा–विस्तार
शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केटयार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगाव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१–१२–१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., जनरल मॅनेजर.
रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.

## काळ्या बाजारांत खेळणारा पैसा

### एकूण चलनांतील दडलेल्या चलनाचें प्रचंड प्रमाण

काळ्या पैशाची अथवा दडविलेल्या संपत्तीची व्याख्या, "हिशेबांत न दाखविलेला फायदा" अशी सुटसुटीत करतां येईल. हा पैसा कायदेशीर व्यवहारानें नियंत्रित नसल्यानें व गुप्त व्यवहारांत तो निर्माण होत असल्यानें त्या संबंधांतली सर्व सरकारी देणीं चुकवितां येतात. कांहींच्या मतें असा काळा पैसा ३,००० कोटी रु. असावा तर कांहींचा अंदाज ६,००० कोटी रुपयांइतका अफाट आहे. पण प्रचारांत असलेलें मूळ चलन २,४०० कोटी रु. आहे!

जो माल दुर्मीळ आहे व ज्याचें उत्पादन वा पुरवठा सुधारण्याची कांहीं आशा दिसत नसते अशा मालाच्या किमती प्रामुख्यानें नियंत्रित दरापेक्षा उंचावू लागतात. मालाचा नियंत्रित दर आणि वाढलेल्या किमती यांतील फरक रोखीनें भरला जातो व त्यांतून काळा पैसा निर्माण होतो.

दुसरी गोष्ट मालाचें उत्पादन, वितरण आणि आर्थिक व्यवहार या संबंधांत आज अनेक निर्बंध लादण्यांत आले आहेत. त्यामुळें भ्रष्टाचार वाढला आहे. आपलें काम लवकर व्हावें, यासाठी लांच दिली जाते. अशी ही लांच कित्येकदा रोख दिली जाते किंवा काळ्या पैशांतून खरेदी केलेल्या वस्तूंच्या स्वरूपांतहि दिली जाते. दोन्ही बाबतींत काळा पैसाच निर्माण होत असतो.

सरकारनें जे अवजड कारखाने उभारले आहेत आणि सरकारकडून जो "अवाच्या सवा" पैसा प्रत्यही खर्च होत असतो त्यामुळेंहि काळ्या पैशांत भर पडलेली आहे. शिवाय सरकारतर्फे मोठ्या प्रमाणांत खरेदी-विक्री कांहीं क्षेत्रांत नेहमींच होत असते. कार्यक्षमतेचा बळी देऊन बेकायदा फायदा मिळविण्याचा मोह पडावा असे प्रसंग सरकारी व्यवसायांत आणि कारखानदारींत विपुल येतात त्यांचा फायदा घेतला जातो व त्यांतून "काळा पैसा" निर्माण होतो.

चौथें कारण असें कीं, सरकारी करांचें प्रमाण अधिक असून प्राप्तिकर अधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचे विस्तृत अधिकार बहाल करण्यांत आले आहेत. त्यामुळें दडलेल्या उत्पन्नांचें प्रमाण वाढण्यास उत्तेजन मिळालें आहे. करांचें प्रमाण जर सुसह्य ठेवलें आणि प्राप्तिकर अधिकाऱ्यांचें वर्तन करदात्यांमध्यें विश्वास निर्माण करणारें राहिलें आणि त्यांना न्याय्य व सन्मान्य वागणूक मिळाली तर बहुसंख्य करदाते कर प्रामाणिकपणें भरल्याशिवाय राहणार नाहींत.

पांचव्यांदा, कसेतरी शब्द जुळवून तयार केलेले गुंतागुंतीचे कायदे सामान्य नागरिकांना समजत नाहींत; त्यांच्या मनाचा संभ्रम उडतो. ह्याचा तडताळा आपल्याला विशेषकरून विक्रीकर कायद्यांच्या बाबतींत येतो. व्यवहारांत ते अंमलांत आणतांना समजुतदारपणाचा पूर्णपणें अभाव असतो. त्यामुळें हे कायदे डावलण्याचा मोह होऊ लागतो. त्यांतून या कायद्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी व कायदा डावलणारे यांच्यामध्यें भ्रष्टाचारी संबंध प्रस्थापित होऊ लागतात आणि मग आणखी काळा पैसा प्रसार पाऊ लागतो.

सहावा प्रकार असा कीं ज्यांना प्रामाणिकपणें दोन पैसे मिळविण्याची इच्छा नाहीं, कुवतहि नसते, असे अनेक चारित्र्यहीन लोक राजकीय क्षेत्रांत घुसले आहेत. त्याबरोबर सदाचारी, प्रामाणिक आणि ज्यांना दोन पैसे मिळविण्याचें प्रामाणिक साधन आहे अशा व्यक्ति राजकारणाला विटून या क्षेत्रापासून चार हात दूर राहू लागल्या आहेत. निवडणुकी फार महाग झाल्या आहेत. शिवाय राजकीय जीवनाच्या गरजाहि वाढल्या आहेत. त्यामुळें धंदेवाईक राजकारणी आणि सरकारदरबारचें काम करून घेण्याची ज्यांना जरूरी आहे अशा मतलबी लोकांची पायधुति वाढती आहे. या सर्व भानगडींत काळ्या पैशाची मुक्त देवघेव होत असते.

कामगारांची वेतनवाढ अथवा त्यांना मिळावयाच्या इतर सवलती याबाबत पुढारी व मालक यांच्यांत नेहमींच सौदे होतात. असे सौदे करतांना गुप्तपणें कांहींतरी पैसे घेऊन व कामगार हिताचा बळी देऊन तडजोड केली जाते. असा हा घेतलेला पैसा अर्थात् हिशोबांत कोठेंच दिसणार नाहीं. तो काळ्या पैशांतच मोजावा लागतो.

असा हा काळा पैसा सामान्य कारणासाठी अथवा विवाहसमारंभ यांसारख्या बडेजावीसाठी खर्च केला जातो किंवा जी मालमत्ता उघडकीस येऊं शकणार नाहीं, अशा मालमत्तेंत त्या पैशाचें रूपांतर होत असतें. असा हा पैसा साचविण्याचें माध्यम परवांपर्यंत सुवर्ण होतें. परंतु सुवर्णनियंत्रण आल्यापासून शहरांत घरे दारें अशासारख्या मालमत्तेंत हा पैसा गुंतविला जाऊं लागला आहे. सुवर्णनियंत्रण येतांच मुंबईतल्या जमिनींची किंमत एकदम भडकली आहे. राहत्या जागेसाठी द्यावी लागणारी पागडी आतां अधिक द्यावी लागते. ही झालेली वाढ चिंतनीय खास वाटेल.

सट्टेबाजींतहि हा काळा पैसा वेचला जातो. ज्या मालाची टंचाई आहे, त्या मालाची साठेबाजी करण्यासाठी हा पैसा उपयोगांत आणला जातो आणि त्यांतून आणखी काळा पैसा निर्माण होतो.

जो कांहीं काळा पैसा प्रत्यक्ष उत्पादनाच्या कार्यासाठी वापरला जात असेल तोच काय तो अर्थव्यवस्थेला उपकारक ठरत असेल. अर्थव्यवस्थेंतला जो एक विशिष्ट असंघटित विभाग आहे तेथेंच या काळ्या पैशाचा उत्पादक कामासाठी उपयोग होणें शक्य आहे. कारण अशा या क्षेत्रांतच अधिकाऱ्यांच्या काकदृष्टींतून उत्पन्न छपविणें शक्य असतें.

काळ्या पैशानें भाववाढच होते असें नाहीं तर त्यामुळें प्रामाणिक नागरिकांच्या माथ्यावर इतरहि बोजे येऊन पडत असतात. ज्या प्रमाणांत कर चुकविले जातात त्या प्रमाणांत ही तूट भरून काढण्यासाठी प्रामाणिक नागरिकांना अधिक कर भरण्याची पाळी येत असते.

काळ्या पैशामुळें नीतिमूल्यें घसरतात ही तर सर्वांत भयंकर अशी आपत्ति होय. काळ्या पैशाचा राष्ट्राच्या दृष्टीनें हा अत्यंत अनिष्ट परिणाम म्हणायला पाहिजे. समाजाच्या जोमदार आणि समाजधारणेला आवश्यक अशा मूल्यांचाच यामुळें ऱ्हास होण्याची वेळ येत आहे.

समस्येचा समाचार सहजासहजीं घेणें जमणार नाहीं. कारण अनेक हितसंबंधियांचे हितसंबंध यांत गुंतलेले आहेत. असा हा काळा पैसा भ्रष्टाचारी उद्योगपती आणि व्यापारी, अप्रामाणिक राजकीय कार्यकर्ते, मंत्री, लोकसभासदस्य, इत्यादि मंडळी आपसांत वाटून घेत असतात. त्याचप्रमाणें न्यायअन्यायाची चाड नसलेले भ्रष्ट अधिकारीहि या पापांत सहभागी असतात. तेव्हां काळ्या पैशाबाबत टाकलेलें कोणतेंहि पाऊल या मंडळींविरुद्ध टाकलेलें पाऊल ठरतें.

ज्या कारणांनीं हा काळा पैसा निर्माण होतो तीं कारणेंच मुळांत नष्ट करणें हा या बाबतींत सर्वांत उत्तम उपाय ठरेल. या

बाबत टाकावयाचें पहिलें पाऊल म्हणजे उत्पादनवाढीला उत्तेजन देणें आणि त्या आड जीं जीं नियंत्रणें व जे जे निर्बंध येत असतील तीं काढून टाकणें हें म्हणता येईल.

सरकारतर्फे जो पैसा खर्च होतो तो आटोक्यांत आणला पाहिजे. जरूर त्या कामासाठींच हा पैसा खर्च करण्यांत आला पाहिजे. लोकसभा समितीनें वेळोवेळीं म्हटल्याप्रमाणें सरकारी पैशाचा जो खर्च वारेमाप होतो त्याचा जाबच अनेक बाबतींत दिला जात नाहीं, त्याचा हिशोबच असत नाहीं. कर कपात केली आणि आजचे विविध कायदे सोपे केले तर काळ्या संपत्तीला मोठ्या प्रमाणांत आळा बसूं शकेल.

आणखी एक सर्वोच्च महत्त्वाची गोष्ट केली जावी. आज राजकारणांतून "धंदेवाईक" राजकारण्यांचें समूळ उच्चाटण व्हावयास हवें. सार्वजनिक जीवनांत आणि कार्यांत उत्पन्नाचे साधन असलेल्या चारित्र्यवानांनीं अधिकाधिक रस घेण्याची आज जरूरी आहे. आज सरकारच्या हातीं जी आर्थिक सत्ता केंद्रित झाली आहे तिचें शहाणपणानें विकेंद्रीकरण करण्यांत आलें पाहिजे व ही सत्ता समाजाला परत दिली पाहिजे; आणि ज्यांच्या हातीं राजकीय आणि आर्थिक सत्ता आहे तिचा हिशोब या मंडळींनीं वेळोवेळीं राष्ट्राला दिला पाहिजे. असे कांहीं उपाय योजण्यांत आले तरच काळ्या संपत्तीची ही समस्या योजलेल्या उपायांना कांहीं दाद देईल.

## सरकारी कचेऱ्यांतून विवाहित कर्मचाऱ्यांकरितां संततिनियमनाचीं साधनें

ज्या सरकारी कार्यालयांत पन्नास वा अधिक विवाहित कर्मचारी आहेत अशांच्या उपयोगासाठी संततिनियमनाचीं साधनें त्या त्या कार्यालयांमार्फत पुरविण्याची व्यवस्था आरोग्य खात्याच्या कुटुंबनियोजन विभागातर्फे करण्यांत आली आहे. कार्यालयांतील एका जबाबदार कर्मचाऱ्याकडे हा साधनांचा सांठा ठेवण्यांत येणार असून, त्याचेमार्फत तीं कार्यालयांतील इतरांना दिली जाणार आहेत. संततिनियमनाचीं हीं सर्व साधनें मोफत पुरविलीं जाणार असून कर्मचाऱ्यांना त्यांच्या वापरासंबंधींची आवश्यक माहितीहि एक्स्टेन्शन एज्युकेटर इन् फॅमिली प्लॅनिंग यांचेकडून दिली जाणार आहे. पुणें येथील सेंट्रल बिल्डिंगमधील सर्व खात्यांमधून ही व्यवस्था पूर्ण झाली असून, लौकरच इतरहि कार्यालयांमधून ह्या सुविधेचा लाभ उपलब्ध करून देण्यांत येईल.

निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयांतील सेवकवर्गास दि. ६ रोजीं सायंकाळीं श्री. डी. पी. कुंटे यांनीं संततिनियमनाबाबत माहिती देऊन मार्गदर्शन केलें.

## मॅनेजिंग एजन्सीखालील कंपन्या फक्त ५%

१९६२–६३ मध्यें भारतांत विक्रीस काढलेल्या भांडवलांत परदेशी गुंतवणूक २३% झाली. त्या वर्षीं सुमारें १,५०० नव्या कंपन्या स्थापन झाल्या, त्यांपैकी मध्यवर्ती सरकारची फक्त एक कंपनी होती; राज्य सरकारांच्या सात कंपन्या होत्या. सुमारें २५,००० कंपन्या चालू आहेत, त्यांपैकी सुमारें फक्त ५% कंपन्या मॅनेजिंग एजन्सीखाली आहेत. १५ ऑगस्ट, १९६५ ला बहुतेक मॅनेजिंग एजन्सी करारांची मुदत संपत आहे, त्या वेळीं आणखी काटछाट होईल. १९६२–६३ मध्यें एकूण नव्या कंपन्यांची संख्या कमी झाली, तरी नव्या पब्लिक कंपन्यांची संख्या मात्र वाढली.

## सहकारी चळवळीचा आढावा

१९६१-६२ मधील सहकारी चळवळीचा आढावा घेणारे आणि तपशीलवार माहिती देणारें, रिझर्व्ह बँकेचें हें वार्षिक प्रकाशन नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. ह्या वर्षी सोसायट्यांची संख्या २.८% नें वाढून ती ३,३२,४८८ ची ३,४१,८४१ झाली. त्यापूर्वीच्या वर्षीची वाढ ६.१% होती. निकामी सोसायट्या रद्द करून टाकण्याचें धोरण बऱ्याच राज्यांनीं अवलंबिल्यामुळें संख्येंतील वाढीची गति कमी दिसत आहे. प्राथमिक सोसायट्यांच्या सभासदांची संख्या १०.५% नें वाढून ती ३७८.३६ लक्ष एवढी झाली. सहकारी चळवळींत आतां एकूण लोकसंख्येच्या ४२% लोक ( १८.९२ कोटी ) समाविष्ट झालेले आहेत. सहकारी सोसायट्यांचें खेळतें भांडवल १५३५ कोटी रुपये झालें आहे.

केंद्रीय बँकांची संख्या २१ हीच कायम राहिली. त्यांचें खेळतें भांडवल २२२ कोटी रु. चें २५६ कोटी रु. झालें. त्यापैकी रिझर्व्ह बँकेनें १३२ कोटी रु. दिलेले होते. केंद्रीय बँकांनीं दिलेलीं कर्जें २५६ कोटी रु. चीं होतीं.

मध्यवर्ती सहकारी बँकांची संख्या ३९० ची ३८७ झाली. त्यांचें खेळतें भांडवल ५० कोटी रु. नीं वाढून तें ३५३ कोटी रु. झालें. त्यांपैकी १२४ कोटी रु. च्या ठेवी होत्या. त्यांनीं एकूण ३८४ कोटी रु. चीं कर्जें दिलेलीं होतीं.

२,१५,०८१ शेतकी पतपेढ्यांचे एकूण १९६.७२ लक्ष सभासद होते व त्यांचें खेळतें भांडवल ३२५ कोटी रुपयांचें होतें. १,७१,७७२ सोसायट्यांनीं प्रत्यक्ष कर्जें दिलीं. त्यांची रक्कम २२८ कोटी रु. भरली. एकूण कर्जदार ९९.६२ लक्ष होते; म्हणजे प्रत्येक कर्जदाराला सरासरीनें २२९ रु. कर्ज मिळालें. सोसायट्यांची थकबाकी ६२.९३ कोटी रु. होती; एकूण येण्याशीं थकबाकीचें प्रमाण २४.५% पडलें. पूर्वीच्या वर्षीपेक्षा थकबाकीची रकम आणि प्रमाण ह्या दोहोंतहि वाढ झाली आहे.

सेंट्रल लँड मॉर्गेज बँकांची संख्या १७ होती, त्यांचें खेळतें भांडवल ६१.७० कोटी रु. होतें. त्यांपैकी ४८ कोटी रु. डिबेंचर्सच्या द्वारां उभारलेलें होतें. जून, १९६२ अखेर त्यांचें कर्जें येणें ४७.९० कोटी रु. होतें. प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांची संख्या ५३६ होती.

## भारतीय रेल्वेचे फुकटे प्रवासी

एक एप्रिल ते ३१ डिसेंबर, १९६३ पर्यंत बिनातिकीट प्रवास करणाऱ्या एकूण ५७ लक्ष प्रवाशांना पकडण्यांत आलें. त्यांच्याकडून जादा आकार म्हणून ३८ लक्ष रुपये व तिकीट व सामानाबद्दल यावा लागणाऱ्या आकारापोटीं एकूण १.१८ कोटी रुपये मिळाले. फुकट्या प्रवाशांमुळें भारतीय रेल्वेचें वार्षिक ५ कोटी रुपये नुकसान होत असावें असा अंदाज आहे. यांपैकी सुमारें दोन कोटी रुपये पकडण्यांत येणाऱ्या प्रवाशांकडून जादा आकार, तिकीट व सामान वाहतुकीच्या दरापोटी रेल्वेला मिळतात.

## चीनचें विमानदल रुतलें ?

१९६२ च्या अखेरीस चीननें भारतावर केलेल्या हल्ल्यांत विमानांचा उपयोग टेहळणीसाठी सुद्धां करण्यांत आला नाहीं. विमानाला लागणाऱ्या इंधनाच्या तुटवड्यामुळें चीनचें हवाईदल जमिनींत रुतल्यासारखें झालें असल्याची वार्ता आहे. रशिआकडून होणारा तेलाचा पुरवठा घटत गेल्यामुळें ही परिस्थिति उद्भवली आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.